# फर्टिलायझर असोसिएशन ऑफ इंडिया
## पश्चिम क्षेत्र

3, न्यू कॉमनवेल्थ सोसायटी, 229, लिंकिंग रोड, बांद्रा (वेस्ट), मुंबई - 400 050

दूरभाषः (022) - 26518162 टेलिफेक्स: 26416174 ई-मेल: wr@faidelhi.org faiwrmumbai@vsnl.net


---

एफएआय-डब्ल्यूआर/5.6/ सीपीईपी

डिसेंबर 02 '2013

फर्टिलाइजर असोसिएशन ऑफ इंडिया (एफएआय), पश्चिम क्षेत्र "महाधन अवॉर्ड २०१२-१३" च्या विजेत्यांची घोषणा करीत आहे.

**<u>पुणे, 02 डिसें</u>**: फर्टिलाइजर असोसिएशन ऑफ इंडिया (एफएआय) वेस्टर्न रीजनने बुधवार, २७ नोव्हेंबर २०१३ रोजी पुण्यातील हॉटेल प्राइड येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत '२०१२-१३ साठी महाधन पुरस्कार' विजेते जाहीर केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. श्री आर जी राजन, सह अध्यक्ष, एफएआय - नवी दिल्ली आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - आरसीएफ.

दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएफपीसीएल) आणि गुजरात स्टेट फर्टिलायझर्स अँड केमिकल्स लिमिटेड (जीएसएफसी) यांनी पीक उत्पादकता सुधारणा उत्कृष्टतेसाठी 'महाधन पुरस्कार' आणि रु. ५१,००० चा रोख पुरस्कार विभागून प्राप्त केला. श्री.विजयराव पाटील उपाध्यक्ष, डीएफपीसीएल यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कृष्णा भारती को-ऑपरेटिव्ह लिमिटेड (केआरबीएचसीओ) आणि इंडियन किसान फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेड (आयएफएफसीओ) आणि राष्ट्रीय केमिकल्स कंपनी लिमिटेड (आरसीएफ) यांना 'उर्वरक विस्तार सेवांमध्ये उत्कृष्टता' पुरस्कार आणि रू. ५१,००० रोख पुरस्कार विभागून देण्यात आला. 'उर्वरक विस्तार सेवांमध्ये उत्कृष्टता' मध्ये आरसीएफला सांत्वना पुरस्कार देण्यात आला.

एफएआय - पश्चिम क्षेत्र ने खरीप आणि रबी २०१२-१३ दरम्यान महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि गोवा या पश्चिम क्षेत्रातील पाच राज्यांमधील उद्योगातील सदस्यांना जिल्हा-वार व पीक-वार वैज्ञानिक प्रात्यक्षिके दिली आहेत. कंपन्यांनी केलेल्या कामाच्या आधारावर, पुरस्कारांना संबंधित श्रेणींमध्ये अंतिम स्वरूप देण्यात आले.

पुरस्कार विजेत्यांची निवड डॉ एस एस मगर, माजी उप कुलपती, डॉ बाबासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि भारतीय कृषी विद्यापीठ संघाचे माजी अध्यक्ष, नवी दिल्ली, डॉ. आर.डी. मुळे, माजी कृषी संचालक , महाराष्ट्र आणि श्री. डीडी खोसे, प्रादेशिक कार्यकारी अधिकारी एफएआय-पश्चिम क्षेत्र यांचा समावेश असलेल्या समितीने केली.

यावेळी बोलताना एफएआय (पश्चिम क्षेत्र) व मुख्य व्यवस्थापकीय संचालक - डीएफपीसीएलचे माजी अध्यक्ष श्री. एस.सी. मेहता म्हणाले, "खतांचा उत्पादकांनी शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून अल्पकालीन नव्हे परंतु दीर्घ कालीन विचार करावा. खत कंपन्यांनी एकूण कच्चा माल विरुद्ध उत्पादकता (किरकोळ खर्च नफा प्रमाण) चे लक्षपूर्वक निरीक्षण केले पाहिजे जेणेकरुन शेतकऱ्यांना दीर्घ कालीन फायदा होईल. प्रलंबित खत अनुदान, एनबीएस धोरणात सुधारणा, यूरियाच्या किंमती, समाकलित पोषण व्यवस्थापन आणि खते पुरवठा यांच्यावरील विद्यमान मुद्द्यांवर श्री. राजन यांनी प्रकाश टाकला.

२००८-०९ मध्ये खते विपणन कंपन्या सह संबंधित शेती समुदायांमध्ये 'समाकलित पोषण व्यवस्थापनावर' प्रोत्साहन देण्यासाठी व जागरुकता निर्माण करण्यासाठी श्री. एस.सी. मेहता यांनी महाधन पुरस्कारांची रचना आणि स्थापना केली. संबंधित क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कंपन्यांना हा पुरस्कार दिला जातो.

श्री. आर जी. राजन, श्री. सी. एस. मेहता, माजी अध्यक्ष, एफएआय (पश्चिम क्षेत्र) आणि मुख्य व्यवस्थापकीय संचालक - डीएफपीसीएल, श्री जी.आर.गोवेस, अध्यक्ष - अॅग्रीबिजनेस, श्री अरविंद कुलकर्णी, एसो. उपाध्यक्ष - फर्टिलायझर (डीएफपीसीएल), श्री अशोक घसघसे, संचालक - विपणन (आरसीएफ), श्री. के.के किणेकर, मुख्य व्यवस्थापकीय संचालक - विपणन, जुवारी अॅग्रो केमिकल्स लिमिटेड (जेएसीएल) आणि श्री एस.ए. पटेल, सल्लागार, विपणन (जीएसएफसी) बैठकीसाठी उपस्थित होते.

श्री. डी. डी. खोसे यांनी पश्चिम क्षेत्रातील खरीप २०१३ मधील खतांचे आणि शेतीविषयक परिदृष्यांचे पुनरावलोकन केले आणि २०१३ च्या उर्वरित कालावधीच्या संभावनांवर चर्चा करण्यात आली.

असोसिएशन च्या पश्चिमी क्षेत्रामध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि गोवा यासारख्या शेतीविषयक प्रगतीशील राज्यांचा समावेश आहे.

एफएआय (पश्चिम क्षेत्र) चे श्री बुरुजवाले व श्री. शेटे आणि डीएफपीसीएलचे श्री. सतीश नर्तम व श्री. संजय बिराजदार यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

डावीकडून उजवीकडे : सर्वश्री अरविंद कुलकर्णी, एव्हीपी, डीएफपीसीएल, बी.के. किणेकर, मुख्य व्यवस्थापकीय संचालक - विपणन, झेडएसीएल, विजयराव पाटील, एव्हीपी, डीएफपीसीएल, डी.डी. खोसे, प्रादेशिक कार्यकारी एफएआय-पश्चिम क्षेत्र, आर.जी. राजन, सह-अध्यक्ष, एफएआय - नवी दिल्ली आणि अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक - आरसीएफ, एस.सी. मेहता, माजी अध्यक्ष, एफएआय (पश्चिम क्षेत्र) आणि मुख्य व्यवस्थापकीय संचालक - डीएफपीसीएल, डॉ. आर.डी. मुळे, माजी कृषी संचालक, महाराष्ट्र.

*************